# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल जि.रायगड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कार्यालय-** आयुक्त मुख्यालय, २ रा मजला , देवाळे तलावाच्या समोरच, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल

**संपर्क :** ०२२-२७४५८०४०/४१/४२

**Email id:** panvelcorporation@gmail.com


**जा.क्र. पमपा/उद्यान/९९२२/प्र.क्र.१३/** ३६६ / २०२३ **दिनांक** १७ / ०५/२०२३

# द्वितीय जाहिर निविदा सुचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षाच्या मुल्यांकनाचा अनुभव असणाऱ्या क्षेत्रातील व्यक्ती यांची नेमणुक करणेबाबत पात्र व इच्छुक व्यक्ती यांचेकडून निविदा मागविण्यात आली आहे.

सदरकामी कोरी निविदा कार्यालयीन वेळेत दि.१८/०५/२०२३ ते दि. २६/०५/२०२३ पर्यंत मिळतील. सदरच्या निविदा दि.२९/०५/२०२३ दुपारी ०३:०० पर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. निविदेबाबत अटी व शर्ती व इतर सर्व माहिती कार्यालयीन वेळेत वृक्ष प्राधिकरण विभागात पहावयास मिळतील. सदरहू कामाचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | निविदा प्रसिध्दीचा कालावधी | वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामीचे दर (प्रति वृक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षाच्या मुल्यांकनाचा अनुभव असणाऱ्या क्षेत्रातील व्यक्ती यांची नेमणुक करणेबाबत. | १ वर्ष | दिनांक १८/०५/२०२३ ते दिनांक २६/०५/२०२३ (७ दिवस) | |

निविदाधारकाचे नाव व स्वाक्षरी

Rasal

(प्रशांत रसाळ)
अति.आयुक्त-(I)
पनवेल महानगरपालिका

2nd Call फेरनिविदा टिपणी NEW

# पनवेल महानगरपालिका

## निविदा -

## पमपा/उद्यान/९१२३/प्र.क्र. १२ / २१० /२०२३

**वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षाच्या मुल्यांकनाचा अनुभव असणाऱ्या क्षेत्रातील व्यक्ती यांची नेमणुक करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| प्र.अधिक्षक<br>वृक्ष प्राधिकरण विभाग | सहा.आयुक्त<br>प.म.पा. पनवेल | उपायुक्त<br>प.म.पा. पनवेल |
| मुख्य लेखा अधिकारी<br>प.म.पा. पनवेल | मुख्य लेखा परिक्षक<br>प.म.पा. पनवेल | अतिरीक्त आयुक्त-(I)<br>प.म.पा. पनवेल |

**सन २०२२-२३**

## निविदेत सहभाग

१. निविदा http://www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात आलेली आहे.

२. निविदाधारकाने आपली निविदा बंद लिफाफामध्ये टेंडरद्वारे सादर करावयाची आहे.

I) निविदाधारकाने बंद लिफाफामध्ये सादर करावयाचे दस्तऐवज खालीलप्रमाणे :-

१. अ) महाराष्ट्र शासनाचे वन विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/ कर्मचारी (सेवानिवृत्ती बाबतचे प्रमाणपत्र/कागदपत्रे) यांची विभागीय चौकशी चालु नसावी, तसेच फौजदारी स्वरुपाचे गुन्हा नसल्याबाबचे प्रतिज्ञापत्र सादर करावे. (१०० रु. बाँड पेपर वर). किंवा

ब) एम.एस.सी बॉटनी पदवीधारक असल्याचे प्रमाणापत्र आवश्यक. किंवा

क) सदर व्यक्ती कृषी पदवीधारक किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (कृषी पदवीधर प्रमाणपत्र आवश्यक) किंवा

ड) उद्यान पर्यवेक्षक या पदावरुन सेवानिवृत्त अधिकारी (सेवानिवृत्ती बाबतचे प्रमाणपत्र/कागदपत्रे)

२) आधारकार्ड ची छायांकित प्रत.

३) पॅनकार्ड ची छायांकित प्रत.

४) झाडांचे वय आणि इतर नमुने मुल्यांकणांचा अनुभव असणारी व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल, तसेच किमान ०५ वर्षे सेवा केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक.

II) **इतर अटी व शर्ती :-**

१) महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२) एक महिन्याची आगाऊ नोटीस देऊन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त पनवेल महानगरपालिका यांना राहतील. तसेच सदरचा अधिकार हा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही सेवा समाप्त करावयाची असल्यास आगाऊ एक महिन्याची नोटीस देणे बंधनकारक राहील.

३) नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

४) नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Intrest) जाहिर करणे आवश्यक राहील.

५) नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे /माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणेकामी बंधपत्र देणे आवश्यक राहिल.

६) नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

७) नियुक्त केलेली सेवा ही फक्त सहा महिन्याच्या मर्यादेकरीताच राहणार आहे. तथापी, सहा महिन्याच्या कालावधीत आपल्या कामाचे मुल्यमापन करुन पुढे सदरची सेवा सुरु ठेवणे किंवा कसे? याबाबत मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

८) यापूर्वी करणेत आलेल्या सेवा कालावधीचा तपशिल तसेच विभागीय चौकशी, फौजदारी गुन्हा याबाबतची माहिती चुकीची दिल्यास तसेच सेवा कालावधीत गैरवर्तणूक केल्यास संबंधिताची सेवा तात्काळ समाप्त करणेत येईल.

९) नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अन्य सेवा-सुविधा व कोणत्याही प्रकारचे वेतन/मानधन आपल्याला देय असणार नाही.

१०) सेवा ही महापालिका क्षेत्रासाठी मर्यादीत असेल व मा.आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त व विभाग प्रमुख आदेशीत करतील ती कामे विहित पध्दतीने पूर्ण करणे आपणांस बंधनकारक राहतील.

११) आपल्या नियुक्तीबाबत कोणताही वाद उद्भवल्यास महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

१२) वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षाच्या मुल्यांकनाचा अनुभव असणाऱ्या क्षेत्रातील व्यक्ती हा वनविभागाचा सेवानिवृत्त कर्मचारी / अधिकारी तसेच कृषी पदवीधर असावा.

१३) वृक्षाचे वय निर्धारीत करणेकामीचे दर हे GST सह देण्यात यावे.

१४) वृक्षाचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षांची समक्ष स्थळपहाणी करणेकरीता स्वत:चे वाहन वापरावे लागेल भत्ता अनुज्ञेय नसेल.

१५) सदरील निविदा ही वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी असल्याने प्रति वृक्ष मंजूर दरानुसार गणनेप्रमाणे मानधन अदा करणेत येईल.

(प्रशांत रसाळ)
अति.आयुक्त-(I)
पनवेल महानगरपालिका

# पनवेल महानगरपालिका

## <u>द्वितीय जाहीर निविदा सुचना</u>

पनवेल महानगरपालिका हद्दीतील वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षाच्या मुल्यांकनाचा अनुभव असणाऱ्या क्षेत्रातील व्यक्ती यांची नेमणुक करणेबाबत पात्र व इच्छुक व्यक्ती यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

सदरकामी कोरी निविदा कार्यालयीन वेळेत दि.१८/०५/२०२३ ते दि. २६/०५/२०२३ पर्यंत मिळतील. सदरच्या निविदा दि.२६/०५/२०२३ दुपारी ०३:०० पर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. निविदेबाबत अटी व शर्ती व इतर सर्व माहिती कार्यालयीन वेळेत वृक्ष प्राधिकरण विभागात पहावयास मिळतील.

PANVEL MUNICIPAL CORPORATION
पनवेल महानगरपालिका पनवेल - रायगड.
PANVEL - RAIGAD

( कैलास गावडे )
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/उद्यान/९९२३/प्र.क्र.१३/६६७/२०२३
दिनांक १७/०५/२०२३